जिल्हाधिकारी, लातूर यांचे कार्यालय
(नियोजन विभाग)

---

**वाचाः-** १. महाराष्ट्र शासन,नियोजन विभाग,मंत्रालय मुंबई यांचा शासन निर्णय क्र. विका २००७/प्र.क्र.१७० /का १४८२ दिनांक १३ सप्टेंबर २०११.

२. मा.आ.श्री. अमित विलासराव देशमुख,विधानसभा सदस्य, लातूर (शहर) मतदारसंघ यांचे पत्र जा.क्र. ला./२०२/२०१३-१४ दिनांक २०/०६/२०१३ रोजीचे शिफारस पत्र.

३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांचे पत्र जा.क्र./रोहयो/प्रशा/३/४५८९/१ दिनांक १६ जूलै, २०१३.

---

जा.क्र.२०१३-१४/नियो/आस्थाविका/कार्या.४ /प्र.मा./११७० दिनांकः २३/०७/२०१३.

**//प्रशासकीय मंजुरी आदेश//**

उपरोक्त नमूद केलेल्या शासन निर्णयाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारानूसार मी जिल्हाधिकारी, लातूर या आदेशान्वये **आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०१३-१४** या वित्तीय वर्षात **मा.आ.श्री. अमित विलासराव देशमुख, विधानसभा सदस्य, लातूर (शहर) मतदारसंघ** यांनी उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या शिफारस पत्रान्वये मंजूरस्तव प्रस्तावीत केलेल्या व संदर्भ क्र. ३ अन्वये या कार्यालयास प्राप्त अंदाजपत्रकानुसार खालील **एक (१)** कामास सर्वसाधारण योजनेंतर्गत पुढील अटी व शर्तीला अधिन राहून प्रशासकीय मंजूरी देत आहे. मंजूर कामे खाली दर्शविलेल्या संबंधित कार्यान्वयीन यंत्रणाकडे सोपविण्यात येत आहे.

| प्र.मा आदेश क्र. | मंजुर करण्यांत येणाया कामाचे नांव | तांत्रिक मान्यता दिनांक व क्रमांक | कार्यान्वयीन यंत्रणा | प्र.मा. रक्कम (रू.लाखात) | परिरक्षण करणाया यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | लातूर शहरातील प्रभाग क्र. 33 मधील शेख ईस्माईल यांच्या घरापासून ते परिवार किराणा स्टोअर्स पर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे. | १६/०७/२०१३ ०३ | का.अ.सा.बा. विभाग, लातूर | ४.९५ | आयुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर |
| | **एकूण** | | | **४.९५** | |

**या आदेशान्वये एकूण रक्कम रु. ४.९५ लक्ष (अक्षरी रू. चार लक्ष पंच्यान्नव हजार फक्त) रक्कमेच्या एक (१) कामास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे.**

<u>**अटी व शर्ती**</u>

१) या प्रशासकीय मान्यतेतील समाविष्ट असलेले काम अन्य कोणत्याही योजनेतुन घेण्यांत आलेले नाही. याबाबतची खात्री करून सदर कामाची द्विरूक्ती होणार नाही याची दक्षता संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेनी घ्यावी.

२) आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यांत येणाया कामांना तांत्रिक मान्यता देणाया सक्षम अधिकायाने प्रचलीत मापदंडानुसार विहीत मान्यतेच्या अटी व शर्तीची पुर्तता काटेकोरपणे करणे बंधन कारक राहील

३) आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यांत येणाया कामाच्या अमलबजावणतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती, विधीमंडळ कामकाज, खर्चाचा ताळमेळ, विनियोजन लेखे इत्यादी बाबीसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा जबाबदार राहील.

४) शासनाकडून योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामास नियोजन विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग/ग्राम विकास विभाग यांनी विहीत केलेले निकष पाळावयाचे असून, शासनाच्या मापदंडानुसार खर्च करावयाचे असून,

---

रस्त्याच्या कामामध्ये रस्त्याची मजबुती करण्यास या आदेशान्वये प्रशासकीय मंजूरी दिली असल्यास महाराष्ट्र नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र.३१२/का-१४४५ दिनांक ०१ जून, १९९८ अन्वये पूर्तता करुनच कामे हाती घ्यावी.

५) शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार सदरची कामे पूर्ण होताच कामाच्या दर्शनिभागावर आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१३-१४ मध्ये घेण्यात आलेले काम व खर्चाची रक्कम इत्यादी माहितीचा फलक लावावा.

६) या कामाचे निरीक्षण व तपासणी जिल्हाधिकारी यांनी नियूक्त केलेल्या अधिका-यांकडून अथवा महाराष्ट्र शासन नियोजन विभागाच्या अधिका-यांकडून होवू शकेल.

७) सदरील निधी संबंधित यंत्रणेने दि. ३१/०3/२०१४ पर्यंत १००% टक्के खर्च करावा.

८) वितरीत केलेले अनुदान व्यपगत होणार नाही तसेच, अखर्चीत राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

९) ज्या कामाकरिता निधी वितरीत केलेला आहे त्याच कामावर  निधी खर्च करावा अन्य कामावर खर्च केल्यास जबाबदारी आपणावर राहील.

१०) या योजनेअंतर्गत काम पुर्ण झाल्यावर विहीत नमुन्यांत कामाच्या पुर्णत्वाचा दाखला व उपयोगिता प्रमाणपत्र कामाच्या फोटोसह या कार्यालयास सादर करावे.

११) खर्चाचा मासिक प्रगती अहवाल दरमहा ५ तारखेपर्यंत जिल्हा नियोजन समिती कार्यालयाकडे पाठवावेत. तसेच महालेखापाल २  नागपूर यांचेकडील ताळमेळाचे त्रैमासिक अहवाल विहीत कालावधीत सादर करावेत.

१२) या आदेशान्वये वितरीत केलेला निधी खालील लेखा शिर्षाखाली खर्ची टाकावा. तसेच झालेला खर्च याच लेखा शिर्षाखाली महालेखापालाकडे नोंदविण्यांत येईल याची दक्षता घ्यावी.

नियोजन विभाग (मागणी क्र.ओ १०)
प्रधान लेखाशिर्ष-४५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
१०२ सामुहिक विकास,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना (१)
बहुउद्देशिय कार्यक्रम,(००) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम (संकेतांक ४५१५००१२)

**प्रति:-**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर  यांना पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव.

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी, लातूर.**

**प्रति:-**

१. मा.आ.श्री. अमित विलासराव देशमुख,  विधानसभा सदस्य, लातूर (शहर) मतदारसंघ, मु.पो. बाभळगांव ता.जि. लातूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. निवड नस्ती.

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी, लातूर.**

जिल्हाधिकारी, लातूर यांचे कार्यालय
(नियोजन विभाग)

---

**वाचाः-** १. महाराष्ट्र शासन,नियोजन विभाग,मंत्रालय मुंबई यांचा शासन निर्णय क्र. विका २००७/प्र.क्र.१७० /का १४८२ दिनांक १३ सप्टेंबर २०११.

२. मा.आ.श्री. अमित विलासराव देशमुख, विधानसभा सदस्य, लातूर (शहर) मतदारसंघ यांचे पत्र जा.क्र. ला./२०३/२०१३-१४ दिनांक २०/०६/२०१३ रोजीचे शिफारस पत्र.

३. केंद्र शासनाचे संगणक दर रार पत्रक RC No. Computers/IT-I/RC-७१०९००००/१२१२/८१/०१२५७/३८५६/ ४७१६३ Date ३१ मे २०१३. For the Supply of Computers Desktop and Feripherals.

४. नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक १२/०३/२०१३.

---

जा.क्र.२०१३-१४/नियो/आस्थाविका/कार्या.४ /प्र.मा./**१३६६** दिनांकः **३०/०८/२०१३.**

**//प्रशासकीय मंजुरी आदेश क्र. 2 //**

उपरोक्त नमुद केलेल्या शासन निर्णयाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी जिल्हाधिकारी, लातूर आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१३-१४ वित्तीय वर्षात खालील नमुद केलेल्या कामास पुढील अटी व शर्तीवर प्रशासकीय मंजूरी देत आहे. मा.आ.श्री. अमित विलासराव देशमुख, विधानसभा सदस्य, लातूर (शहर) मतदारसंघ यांचे पत्र जा.क्र. ला./२०३/२०१३-१४ दिनांक २०/०६/२०१३ अन्वये व Configuration नुसार प्रति संगणक रु. ३२,४४४.८३ असल्याने एकूण दोन (०२) संगणकाची किंमत रु. ६४,८८९.६६ एवढी होते. व ५ टक्के वॅट प्रमाणे ३,२४४.४८ अशी एकूण **रक्कम रु. ६८,१३४.०० (आडुसष्ट हजार एकशे चौतीस फक्त)** एवढी या कार्यालयास कळविलेली आहे. त्या अनुसरुन खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे. मा.आ.श्री. अमित विलासराव देशमुख, विधानसभा सदस्य, लातूर (शहर) मतदारसंघ यांनी प्रस्तावित केलेले असून, मा.आ. महोदयांनी सुचविलेली कामे सर्वसाधारण योजनेतंर्गत मंजूर करण्यात येत आहे. प्रसतावित कामे संदर्भिय क्र. ४ अन्वये खाली दिलेल्या संबंधित कार्यान्वीन यंत्रणा, **सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर** यांचेकडे कार्यान्वीन यंत्रणा म्हणून सोपविण्यात येत आहे. शासन निर्णयानुसार सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर यांनी दोन (०२) संगणकाची खरेदी Configuration प्रमाणे करावी.

| **अ.क्र.** | **संस्थेचे नाव** | **तालुका** | **संगणक** |
|---|---|---|---|
| २ | उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर. | लातूर | ०२ |
| **एकूण** | | | **०२** |

या आदेशान्वये एकूण **रक्कम रु. ६८,१३४.०० (आडुसष्ट हजार एकशे चौतीस फक्त)** रकमेच्या कामास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे.

**<u>सदरची प्रशासकीय मान्यंता खालील अटी व शर्तीवर देण्यांत येत आहे.</u>**

**अटी व शर्ती**

१. संगणक खरेदीची कार्यवाही ही दिनांक ३१ मार्च, २०१४ पूर्वी करण्यांत यावी.
२. कोणत्याही परिस्थितीत मंजूर केलेल्या संगणकाच्या अंदाजीत किंमतीपेक्षा जास्त खर्च करण्यांत येवू नये.
३. महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या शासकीय मापदंडानुसारच संगणक खरेदीची कार्यवाही करावी.
४. संगणक खरेदी नंतर संबंधित कार्यालयाने उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयास न चुकता सादर करावे.
५. संगणक खरेदी नंतर संगणकाचे परिरक्षण (व्यवस्थापन) करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालयाची आहे.
६. सदरील संगणकाची देखभाल दुरुस्ती संबंधित कार्यालयाने करावयाची आहे. तसेच इतर खर्च सुध्दा संबंधित कार्यालयाने करावा याबाबत हमीपत्र संबंधित कार्यालयाने दयावे.

---

७. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०१३-१४ अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या संगणकाची नोंद कार्यालयाच्या जडवस्तु संग्रह नोंद वहीमध्ये घेण बंधनकारक आहे. मंजूर करण्यात आलेले संगणक सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र दरवर्षी न चुकता या कार्यालयास पाठवावे.
८. मंजूर करण्यात आलेल्या संगणकाच्या मॉनिटवर दर्शनिभागावर स्पष्ट दिसेल अशा मा.आ.श्री. अमित विलासराव देशमुख, विधानसभा सदस्य, लातूर (शहर) मतदारसंघ यांच्या वर्षे २०१३-१४ च्या आमदार फंड निधीतून असे ऑईल पेंन्टने लिहावे.
९. संगणक पुरवठा झाल्यानंतर कार्यालय प्रमुखांनी संगणक सुस्थितीत सुरु केल्याचे प्रमाणपत्र व व्यवस्थीत कार्यान्वीत केल्याबाबतचा अहवाल लवकरात-लवकर सादर करणे आवश्यक आहे.
१०. सदरील संगणक निधी विनियोग प्रमाणपत्र तात्काळ या कार्यालयास पाठविण्यात यावे.
११. या कार्यक्रमावर होणार खर्च सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात खालील लेखा शिर्षाखाली होणा-या तरतुदीनून भगविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली टाकण्यात यावा.

नियोजन विभाग (मागणी क्र.ओ १०)
प्रधान लेखाशिर्ष-४५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
१०२ सामुहिक विकास,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना (१)
बहुउद्देशिय कार्यक्रम,(००) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम (संकेतांक ४५१५००१२)

प्रति,

**सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर यांना पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.**

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी, लातूर.**

**प्रति:-**

१. मा.आ.श्री. अमित विलासराव देशमुख, विधानसभा सदस्य, लातूर (शहर) मतदारसंघ, मु.पो. बाभळगांव ता.जि. लातूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर.

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी, लातूर.**

दुरध्वनी क्र.02382-245172 फॅक्स क्र.02382-242330
संकेतस्थळ www. Latur.nic.in E-mail ID laturcollector@ gmail.com Dpolatur24 @ gmail.com